# सर्वसामान्य रुग्णांवर होणार मोफत हृदयरोग उपचार



## छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचा होणार कायापालट

**ठाणे : स्व. आनंद दिघे यांच्या जयंतीदिनी ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने धर्मवीर आनंद दिघे हृदयरोग उपचार केंद्र सुरु करण्यात आले आहे. या उपचार केंद्रात सर्वसामान्य रुग्णांसाठी हृदयासंबंधीच्या टू डी इको पासून ॲन्जिओग्राफी, ॲन्जिओप्लास्टी, स्टेंन्ट टाकणे, याशिवाय बायपास शस्त्रक्रियेसह तदनुषंगिक विविध उपचार हे विनामूल्य केले जाणार आहेत.**

>>पान 4 वर

## सर्वसामान्य रुग्णांवर होणार मोफत हृदयरोग उपचार



महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या अंतर्ग असणा-या नागरिकांना हे उपचार मोफत केले जाणार आहेत. नागरिकांना सुद्धा नाममात्र दरात येथे हृदयासंबंधीची वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार असल्याचे महापौर नरेश म्हस्के यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे अशा विविध अद्ययावत सुविधांनी आता परिपूर्ण होत असून याहून अधिक सुपरस्पेशालीटी सुविधा या ठिकाणी उपलब्ध होण्याची गरज आहे त्यारिता ठाणे महानगरपालिका आणि मी स्वतः या संपूर्ण रुग्णालयाचा कायापालट होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करु, असा विश्वास राज्याचे नगरविकास मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

स्व. आनंद दिघे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे सर्वसामान्य रुग्णांसाठी वरदान ठरले आहे. ठाण्याबरोबरच संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील रुग्ण येथे उपचारासाठी येत असतात. या रुग्णालयात सुपर स्पेशॅलीटी उपचार पध्दती उपलब्ध व्हावी यासाठी माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांच्या विशेष प्रयत्नातून ठाणे महानगरपालिका आणि प्लॅटिनम हॉस्पिटल प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या धर्मवीर आनंद दिघे हृदयरोग उपचार केंद्राचा लोकार्पण सोहळा आज पालकमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व महापौर

यावेळी खासदार राजन विचारे, आमदार रविंद्र फाटक, उपमहापौर पल्लवी कदम, स्थायी समिती सभापती संजय भोईर, सभागृहनेते अशोक वैती, महापालिका आयुक्त डॉ.बिपिन शर्मा तसेच क्रीडा आणि समाज कल्याण आणि सांस्कृतिक कार्य समिती सभापती प्रियांका पाटील, आरोग्य परीक्षण आणि वैद्यकीय सहाय्य समिती सभापती निशा पाटील, स्थानिक नगरसेविका अपर्णा साळवी यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज

आणि प्लॅटिनम हॉस्पिटल प्रायव्हेट लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. संजितपॉल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियांका पॉल उपस्थित होते.

धर्मवीर आनंद दिघे हृदय रोग उपचार केंद्रामध्ये 100 खाटांची योजना असून आज त्यातील 70 खाटा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. ठाणेकरांसाठी विषेशत: हृदय रुग्णांसाठी ही अतिशय चांगली सुविधा या ठिकाणी निर्माण केल्याबद्दल पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी